**भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तालय**
**पत्ता:- पुणे नाशिक हायवे, सी. आय. आर. टी. जवळ, एमआयडीसी भोसरी, पुणे.२६ फोन नं. ०२०- २७१२४७२८**
**ई--मेल आयडी** psbhosari.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट दिनांक ०४/०८/२०२३**

# † चैनचोरी करणारे सराईत गुन्हेगार भोसरी पोलीसांकडुन ४८ तासात जेरबंद †

दिनांक २७.०७.२०२३ रोजी सकाळी ०५/४५ वा. चे सुमारास भोसरी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये नटीज चपाती सेंटर, सकुबाई गार्डन जवळ, गवळी नगर, भोसरी पुणे याठिकाणी मोटार सायकलवरुन आलेल्या अनोळखी दोन चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावुन चोरी करुन घेवुन गेले होते. त्यानंतर थोड्याच वेळात भोसरी परीसरामध्ये आणखी दोन वेगवेगळया ठिकाणी अशाच पध्दतीने मोटार सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी चोरट्यांनी महिलांच्या गळ्यातील मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावुन चोरटे मोटार सायकलवर निघुन गेल्याच्या घटना घडल्या होत्या. सदर घटनेमध्ये चोरट्यांनी नंबर प्लेट नसलेली मोटार सायकल व अंगात काळे रेनकोट परीधान करुन तोंड रुमालाने झाकुन ओळख लपविण्याचा पुर्ण प्रयत्न केला होता. एकाच वेळी भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत तिन चैनचोरीच्या गंभीर घटना घडल्याने मा. पोलीस उपायुक्त परि- १ श्री. विवेक पाटील सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग श्री. सतीश कसबे सो. तसेच भोसरी पोलीस स्टेशनचे व.पो.नि. श्री. भास्कर जाधव यांनी घटनास्थळी भेट देवुन तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना अनोळखी चोरट्यांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना केल्या होत्या. आरोपींनी आपली ओळख उघड होणार नाही याची पुर्ण खबरदारी घेतल्याने व पाउस असल्याने सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये आरोपीबाबत कोणतीही स्पष्ट माहीती मिळुन येत नव्हती. तरी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार परीसरातील यांनी घटना घडलेल्या परीसरात बारकाईने पाहणी करुन मुख्य रस्त्यासह **गल्लीबोळातील १५० पेक्षा जास्त सी.सी.टी.व्ही. कॅमेरे** तपासुन चैनचोरी करणारे अज्ञात चोरट्यांना परतीच्या मार्गावर माग घेतला, तेव्हा आरोपी हे दिघी परीसरात गेलेले असल्याची माहीती मिळाली. त्यानंतर तपास पथकाने आरोपीची ओळख पटविली व दि.२९/०७/२०२३ रोजी पोलीस उप-निरीक्षक मुकेश मोहारे यांना गोपनीय बातमीदाराकडुन सदर गुन्ह्यातील आरोपी हे सी.एम.ई. भिंतीलगत आदर्शनगर दिघी परीसरात बसले असल्याची माहीती मिळताच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी वेगवेगळे पथके तयार करुन दिघी परीसरात सी.एम.ई भिंतीलगत कौशल्यपुर्ण पध्दतीने छापा टाकला व सदर गुन्ह्यात आरोपी नामे राहुल रमेश चव्हाण वय २४ वर्षे रा. भारतमातानगर दिघी पुणे व करणसिंग सुरजितसिंग भादा वय २० वर्षे रा. दिघी पुणे यांना ताब्यात घेतले. त्यांनी तपासात सदर गुन्ह्याची कबुली दिली असुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांचेकडुन **भोसरी पोलीस स्टेशनचे तीन चैनचोरी, दोन घरफोडी, दोन चोरीचे असे एकुण ०७ गुन्हे उघडकीस आलेले असुन त्यांचेकडुन एकुन ४,३९,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत यश आलेले आहे.**

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह. आयुक्त श्री. डॉ. संजय शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ – १ श्री. विवेक पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग श्री. सतीश कसबे सो., वरिष्ठ पोलीस

निरीक्षक श्री. भास्कर जाधव, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरिक्षक कल्याण घाडगे, पोलीस उप-निरीक्षक मुकेश मोहारे, तसेच सहा. पोलीस फौज. राकेश बोयणे, पो.अं. हेमंत खरात, नवनाथ पोटे, सागर जाधव, सचिन सातपुते, प्रभाकर खाडे, तुषार वराडे, आशिष गोपी, स्वामी नरवडे, महिला अंमलदार प्रतिभा मुळे, सुषमा पाटील, भाग्यश्री जमदाडे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(विवेक पाटील )**
**पोलीस उप-आयुक्त**
**परिमंडळ - १, पिंपरी चिंचवड.**